महाराष्ट्र शासन
वन विभाग

**प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.**

O/o Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य

Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State

"Van Bhavan" 3rd Floor, Ramgiri Road, Civil Lines, Nagpur 440 001

Phone - 0712-2549563
E-mail - pccfwlngp@mahaforest.gov.in
Website - www.mahaforest.gov.in

By E-mail/महत्वाचे

क्रमांक :-कक्ष-२३(६)/वजी/प्र.क्र.८३/(१६-१७)/ दिनांक:-21/09/२०२६

प्रति,

१. पोलीस आयुक्त (सर्व)
२. परिक्षेत्र पोलीस महानिरिक्षक (सर्व)
३. पोलीस अधिक्षक (सर्व)
४. मुख्य वनसंरक्षक/ वनसंरक्षक (प्रादेशिक) (सर्व)
५. वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक (सर्व)
६. उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी (सर्व)

## संयुक्त परिपत्रक

विषयः- वन्यजीव अपराध प्रतिबंध व अन्वेषण मध्ये वनविभाग व पोलिस विभागात समन्वय बळकट करण्याबाबत.

वन्यजीव अपराध जसे फासे लावून शिकार करणे, विष देऊन / विद्युत प्रवाह सोडून शिकार करणे, वन्यप्राण्याचे अवयवाची तस्करी करणे किंवा ते बाळगणे याची व्याप्ती दिवसें-दिवस वाढत असून संघटीत टोळ्यांचा सहभाग सुद्धा आढळत आहे. सदर अपराधामध्ये गुंतलेले व्यक्ती / टोळ्यांचे वावर आंतर जिल्हा किंवा आंतर राज्यीय असल्याचे अनेक प्रकरणात दिसून आलेले आहे. सदर परिदृश्यात प्रभावी प्रतिबंध व अन्वेषण करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी वनविभाग व पोलिस विभागात समन्वय बळकट होणे आवश्यक आहे.

सद्या जिल्हा, महसूल व राज्य स्तरावर व्याघ्र कक्ष कार्यरत असून सदर व्याघ्र कक्षाची बैठक वेळोवेळी आयोजित करून वन्यजीव अपराधांचा आढावा घेण्यात येतो. दिनांक १२/०८/२०२६ रोजी झालेल्या राज्यस्तरीय व्याघ्र कक्षाच्या बैठकीत वनविभाग व पोलिस विभागात प्रभावी समन्वय स्थापित करण्यासाठी वनविभाग व पोलिस विभागामार्फत संयुक्त परिपत्रक काढण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार सदर संयुक्त परिपत्रक जारी करण्यात येत आहे. तरी परिपत्रकातील खालील सूचनांचे वनविभाग व पोलिस विभागांनी काटेकोरपणे पालन करावे.

१. जिल्हा स्तरीय व्याघ्र कक्षाची बैठक जिल्हा पोलिस अधिक्षक यांचे अध्यक्षतेखाली दर महिन्याला आयोजित करण्यात यावी. सदर बैठकीत जिल्ह्यातील उपवनसंरक्षक (सर्व), विभागिय वन अधिकारी (सर्व) व जिल्हा व्याघ्र कक्षाचे सर्व सदस्यांना बोलाविण्यात यावे. जिल्हा व्याघ्र कक्षाच्या मासिक बैठकीत महत्वाचे शिकार प्रकरण तसेच वन्यप्राणी अवयव तस्करी प्रकरणाचा आढावा घेऊन अन्वेषण कामाचा प्रगतीचे विश्लेषण करण्यात

यावे. जिल्हयात वन्यप्राणी शिकारी (बदुकीने, फासे लावून, विष देऊन, विद्युत प्रवाह सोडून) बाबत संवेदनशील क्षेत्राची प्रतिबंधात्मक व्यवस्थाबाबत विशेष आढावा घेण्यात यावा. बैठकित प्रत्येक मागील बैठकीत कार्यवाहीसाठी निश्चित झालेल्या मुद्यांबाबत प्रतिपूर्तीचा आढावा आवर्जून घेण्यात यावा. बैठकीचे कार्यवृत्तांत तयार करतांना चर्चा झालेले विषय, त्यावर ठरलेले कार्यवाहीचे मुद्दे, जबाबदार अधिकारी व पुर्तता करावयाचा वेळ मर्यादा स्पष्टपणे नमुद करण्यात यावी. बैठकित ठरविलेले कार्यवाहीचे मुद्यांवर पूर्तता होई पर्यंत पुनरावलोकन करत रहावे.

२. महसूल विभाग स्तरीय व्याघ्र कक्षाची बैठक प्रत्येक तीन महिन्यात एकदा आयोजित करण्यात यावी. सदर सभेत वनवृत्ताचे प्रभारी अधिकारी, व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक, विभागातील सर्व उपवनसंरक्षक, विभागिय वन अधिकारी, सर्व जिल्हा पोलिस अधिक्षक यांना बोलविण्यात यावे. सदर बैठकित सर्व संबंधित जिल्हयाचे व्याघ्र कक्षाची झालेल्या मासिक बैठकीच्या व त्यामध्ये ठरविलेले कार्यवाहीचे मुद्यांवर झालेली कार्यवाहीचा तपशीलवार आढावा घेण्यात यावा. सभेत आंतर जिल्हा व आंतर राज्य वन्यजीव अपराधांचा विशेष आढावा घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना निश्चित करण्यात याव्यात.

३. प्रभावी देखरेखी (Effective Monitoring) साठी प्रत्येक जिल्हयात वन्यजीव अपराध कामगिरी निर्देशांक (Performance Indicator) निश्चित करण्यात यावा. सदर कामगिरी निर्देशांक मध्ये महत्वाचे वन्यजीव अपराधांचा शोध, आरोपींची अटक, जप्त झालेले साहित्य, पुनरावृत्ती करणारे गुन्हेगार शोधणे या बाबी समाविष्ठ असाव्यात. काही महत्वाचे वन्यप्राणी अपराध अन्वेषण हे वनविभाग व पोलिस विभागांनी संयुक्तपणे हाती घ्यावे. वन्यप्राणी अपराधासाठी प्रतिबंधात्मक स्वरुपाची केलेली कामगिरी, या बाबी सुध्दा कामगिरी निर्देशांक मध्ये समाविष्ठ करण्यात यावी. सदर कामगिरी निर्देशांक संबधित जिल्हयाचे पोलिस अधिक्षक व उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी संयुक्तपणे तयार करावा. सदर कामगिरी निर्देशांक तयार केल्यास कायदा अंमलबजावणी प्रभावी होण्यास मदत होईल. (उदा. वाघाची शिकार इत्यादी.)

४. गंभीर वन्यजीव गुन्हा उघडीस आल्यास जिल्हा व्याघ्र कक्ष यांनी वनविभाग व पोलिस विभागाची एक संयुक्त अन्वेषण चमू निर्मित करुन त्या मार्फत झडती, जप्ती, आरोपी शोधणे, डीजीटल पुरावे गोळा करणे, आर्थिक साखळी शोधणे, आंतर राज्यीय गुन्हा साखळी उघड करणे या सारखी कार्यवाही करण्यात यावी.

५. प्रत्येक जिल्हयात वन विभागातील १ व पोलिस विभागातील १ अधिकारी वन्यजीव गुन्हयासाठी समन्वयक (Nodal) आधिकारी म्हणून नियुक्त करण्यात यावा. सदर अधिका-याचे नांव, दूरध्वनी क्रमांक, ई-मेल हे विभागीय स्तरीय व्याघ्र कक्ष व राज्य स्तरीय व्याघ्र कक्ष यांचेकडे देण्यात यावा. तसेच समन्वय अधिका-यात बदल झालयास त्या बाबत सुधारित माहिती सुध्दा तात्काळ देण्यात यावी. तसेच सदर समन्वयक अधिका-यांनी पुढील व्याघ्र कक्षाची बैठकीची वाट न पाहता प्रकरण निहाय तात्काळ कार्यवाही करावी.माहिती

६. प्रत्येक वर्षी जिल्हास्तरावर वन व पोलिस अधिका-यांसाठी वन्यजीव अपराध प्रशिक्षण कार्यक्रम वन अकादमी किंवा पोलिस अकादमी मध्ये आयोजित करण्यात यावा. सदर प्रशिक्षण कार्यक्रमात वन्यजीव कायदे, झडती व जप्ती, पुरावे गोळा करणे, वन्यजीव न्यायवैद्यक (Forensic), सायबर किंवा ऑन लाईन वन्यजीव व्यापार, गुप्तचर जाळे, अन्वेषण तंत्रज्ञान, अभियोग (फिर्याद) दाखल करणे इत्यादी विषय समाविष्ठ करावे.

वरील परिपत्रक हे वनविभाग व पोलिस विभागातील समन्वय प्रभावी व मजबूत व्हावे व अंतत: वन्यजीव अपराधावर निर्बंध व्हावा या दृष्टीकोणातून जारी करण्यात आले आहे. तरी पोलिस व वनविभागाचे अधिकारी यांनी परिपत्रकातील दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

(सदानंद दाते)
पोलिस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य.

(एम. श्रीनिवास रेड्डी)
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

प्रतिलिपी :- १. अपर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र राज्य यांना माहितीकरीता सादर.

२. अपर सचिव (वने), महसूल व वनविभाग, महाराष्ट्र राज्य यांना माहितीकरीता सादर.

क्र.पोमसं/२४/३४/व्याघ्र कक्ष/७९-०१/२०१४ दि.१६/०९/२०२६

संदर्भः- प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-२३(६)/वजी/प्र.क्र.८३/(१६-१७)/२७५२, दि.०९/०९/२०२६

विषयः- वन्यजीव अपराध प्रतिबंध व अन्वेषण मध्ये वनविभाग व पोलीस विभागात समन्वय बळकट करण्याबाबत.

*** ***

उपरोक्त विषयी संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, दि.१२/०८/२०२६ रोजी झालेल्या राज्यस्तरीय व्याघ्र कक्षाच्या बैठकीमध्ये वनविभाग व पोलीस विभागात प्रभावी समन्वय स्थापित करण्यासाठी वनविभाग व पोलीस विभागामार्फत संयुक्त परिपत्रक काढण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. त्याअनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संयुक्त परिपत्रकाचा मसुदा तयार करुन, आवश्यक असल्यास सुधारणा करुन पाठविणेबाबत या कार्यालयास कळविले आहे..

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी या कार्यालयास सादर केलेल्या संयुक्त परिपत्रकाच्या मसुद्यास पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी मान्यता दिलेली असून, सदरचे मुळ परिपत्रक सोबत जोडले आहे.

Gautam

(लखमी गौतम)
विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व सु.)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.